# प्रेस नोट दि.२०/१०/२०२४

वानवडी वाहतुक विभागाअंतर्गत सोलापुर रोडवरील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी व अपघात कमी करण्यासाठी तसेच वाहतुक सुरळीत व सुरक्षित होण्यासाठी आज दिनांक २०/१०/२०२४ पासुन सोलापुर रोडवरील फातिमानगर टी जंक्शन व सिग्नल बंद करुन खालीलप्रमाणे वाहतुकीत बदल करण्यात येत आहे.

➤ **शिवरकर रोडने येणा-या वाहनचालकांसाठी**

१) शिवरकर रोडने येवुन हडपसरकडे जाणा-या वाहनाचालकांनी भैरोबानाला चौकाअगोदर यु टर्न घेवुन सोलापुरकडे जातील.नमुद मार्गावरुन फक्त दुचाकी ,तीन चाकी व चारचाकी कार यांनाच प्रवेश देण्यात येत आहे. तसेच सर्व प्रकारच्या बसेस ,मालवाहु वाहने ,इतर वाहने ही भैरोबानाला चौकातील पेट्रोलपंपाला वळसा घालुन सोलापुर रोडच्या दिशेने जातील.

➤ **स्वारगेटकडुन येणा-या वाहनचालकांसाठी**

१)स्वारगेटकडुन येवुन शिवरकर रोडला जाणा-या सर्व प्रकारच्या बसेसे ,मालवाहु वाहने ,इतर वाहने भैरोबानाला चौकात राईट टर्न करुन उजवीकडे वळुन वानवडीबाजार पोलीस चौकीमार्गे इच्छित स्थळी जातील.

२) स्वारगेटकडुन येवुन शिवरकर रोडला भैरोबानाला चौकातुन जाणा-या दुचाकी ,तीन चाकी व चारचाकी कार या फातिमानगर वरुन सरळ जावुन ए आय पी टी डेपो गेट नं २ (९३ अव्हेन्यु मॉलच्या अलीकडे) यु टर्न घेवुन इच्छित स्थळी जातील.

वरिलप्रमाणे वाहतुकीमध्ये प्रायोगिक तत्वावर बदल करण्यात आले आहे.

(सुनिल पंधरकर)
पोलीस निरीक्षक,
वानवडी वाहतुक विभाग पुणे शहर